## नियमीत दिवाणी मुकदमा नं.११२/२०२१ मधील निशाणी ४५ वरील आदेश

(झीयाउल मजिद नझीर सोंडे वि. विजईप्रताप कांशिराम मल्होत्रा वगैरे)

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, सदरचा दावा वादीने अतितातडीने व घाईघाईत दाखल केला असल्याने दावा दाखल करताना वादीकडून अनावधानाने व नजरचुकीने दावा परिच्छेद क्र.६ व ७ मध्ये टंकलेखनाची चुक झालेली असून सदर चुक दुरुस्त करुन मिळणेची विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व ५ यांना संधी देवूनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविणेत येत आहे.

४. प्रतिवादी क्र. ३ यांनी सदर अर्जास निशाणी ५९ वर म्हणणे देवून सदर अर्जातील कथने नाकारली आहेत. सदर प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी हा वादग्रस्त जागेचे क्षेत्र वाढवू पहात असून दावा दुरुस्ती करण्यामागे वादीचा कोणताही प्रामाणिक हेतू नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. वादीचा अर्ज, प्रतिवादी क्र. ३ चे म्हणणे व अभिलेख वाचून पाहीला. वादी व प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

६. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –**

७. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा ठरावाकरीता तसेच निरंतर व तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, दाव्याचे परिच्छेद क्र. ६ मधील ओळ क्र. ३ व ४ मध्ये तसेच परिच्छेद क्र. ७ मधील ओळ क्र. २ मध्ये '२० मीटर' ऐवजी '२० फुट' असे व 'सुमारे ६ मीटर' ऐवजी 'सुमारे ६ फुट' अशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी मागितलेली दुरुस्ती ही दाव्यातील मुद्दे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर दुरुस्ती झाल्यास

प्रतिवादींना त्यांची अतिरिक्त कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीने मागितलेल्या दावा दुरुस्ती या दाव्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

९. सदरचा वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दाव्यात आवश्यक असलेला मजकूर नमूद केल्यास दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. परंतु वादीने दावा दुरुस्ती मागण्यास विलंब केला आहे. त्यामुळे सदरचा दुरुस्ती अर्ज हा वादीवर खर्च आकारुन मंजूर केल्यास योग्य होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून वादीवर खर्च आकारुन सदर दावा दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवित आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज रु.५००/– इतके खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादी क्र. ३ यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादीने दाव्यामध्ये खर्चाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ४. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2023.05.09 16:39:46 +0530

ठिकाण –उरण
दिनांक – ०६.०५.२०२३.

(निलेश एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.